महाराष्ट्र टाइम्स

**Maharashtra Times**
13 Dec 2016

# येऊरमध्ये डेब्रिजचा भराव?

म. टा. प्रतिनिधी, ठाणे

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या येऊर परिसरात डेब्रिजने भरलेल्या डम्परची नित्याने वाहतूक सुरू आहे. त्यामुळे पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र असलेल्या या भागात डेब्रिजने भरलेले डंपर भराव टाकण्यासाठी जात असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. विशेष म्हणजे, येऊरच्या मुख्य प्रवेशद्वारावर असलेल्या चौकीकडून पुढे प्रवेश करणाऱ्या डम्पर, जेसीबी तसेच अन्य बांधकाम साहित्याच्या गाड्या वनविभागाच्या चौकीजवळ अडविल्या जात नसल्याने या गाड्यांवर नक्की कुणाचा वरदहस्त आहे, हा प्रश्न पर्यावरणप्रेमींकडून उपस्थित होत आहे.

**येऊरमध्ये कोणत्याही प्रकारे नवीन अनधिकृत हॉटेलचे बांधकाम सुरू नसून केवळ दुरुस्तीची कामे सुरू आहेत. बागेच्या लेव्हलिंगची कामे सुरू असून संरक्षक भिंत उभारली जात आहे. त्यासाठी साहित्याची वाहतूक सुरू असून डेब्रिजची वाहतूक केली जात नाही.**

**- संजय वाघमोडे,** परिक्षेत्र वन अधिकारी, येऊर

**उद्यानात डेब्रिजने भरलेले डम्पर कशासाठी सोडले जातात. तसेच, वनविभागाच्या चौकीवरील कर्मचारीही जुजबी चौकशी करून डम्पर बिनदिक्कतपणे पुढे सोडतात. त्यामुळे या प्रकारांनी येऊरमधील वन्यजीवांच्या अधिवासालाही धोका होण्याची शक्यता आहे.**

**- अपूर्वा आगवण,** क्रायसेस

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या १०० मीटर ते चार किलोमीटर क्षेत्राच्या बाहेर बांधकाम तसेच अन्य उपक्रम राबविण्यास नुकतीच एक अधिसूचना काढून मुभा देण्यात आली असली तरीही याआधीपासून येऊर भागात डेब्रिजने भरलेल्या डंपरसह विविध पद्धतींचे बांधकाम साहित्य, जेसीबी आदींची बिनदिक्कतपणे वाहतूक सुरू आहे. मागील वर्षात येथील पाटोणपाडा आणि जांभूळ पाडा भागातील १८ एकरांच्या जमिनीवर २०० डम्पर माती टाकण्यात आली होती.